**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), महाराष्ट्र राज्य,नागपूर**
डॉ.**बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३रा माळा,दीक्षाभूमी रोड,श्रद्धानंद पेठ, नागपूर- ४४००२२**
**दूरध्वनी क्र.** 0712-2959381 **CIN:U85300PN2019NPL187405** **ई मेल - mahajyotingp@gmail.com**

जा.क्र.महाज्योती/आस्था/ ७८४ /नागपूर/२०२२ दि.१४/१०/२०२२

# <u>परिपत्रक</u>

MPSC परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी महाज्योतीसोबत करार असलेल्या ज्ञानदीप अकादमी, पुणे या संस्थेकडे प्रशिक्षण सुरु करण्याच्या दृष्टीने नोंदणी सुरु करण्याची सूचना दि.६/१०/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तसेच दि. १०/१०/२०२२ रोजी नोंदणी प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

MPSC परीक्षेचा अभ्यासक्रम या वर्षापासुन UPSC परीक्षेप्रमाणे सुधारित करण्यात आला असताना सदर संस्थेकडे त्यास अनुरूप अशी व्यवस्था उपलब्ध असल्याची पुन्हा एकदा तपासणी करून खात्री करण्यात आली आहे. आता लवकरच **दि.२८/१०/२०२२** पासून प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात होणार आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांना पुन्हा सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी **दि. १५/१०/२०२२ ते दि. २७/१०/२०२२** या कालावधीत सदर संस्थेस भेट देऊन(महाज्योतीकडे ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या) कागदपत्रांची त्यांच्या मूळ प्रतीवरून पडताळणी करून घ्यावी व नोंदणी प्रकिया पूर्ण करावी.

ज्या उमेदवारांनी ऑनलाईन प्रशिक्षणाची निवड केलेली आहे अश्या उमेदवारांनी महाज्योती कार्यालय, नागपूर येथे वर नमूद केलेल्या कालावधीत भेट देऊन मूळ प्रतीवरून पडताळणी करून घ्यावी व नोंदणी प्रकिया पूर्ण करावी.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य,नागपूर